कल्याण डोंबिवली महानगरपालिका
नगर रचना विभाग

अटी व शर्ती

बांधकाम परवानगी क्र.KDMC/TPD/BP/KD/2016-17/53/09
Date - 06/04/2021

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार मौजे–तिसगांव,स.नं.५ हि.नं.२ मध्ये ३९६०.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर ह.वि.ह. क्षेत्रासह ५९३६.७३ चौ.मी बांधकाम क्षेत्रास दि.०३/०३/२०२० अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत UDCPR नुसार Additional Basic FSI व Ancillary FSI चाविचार करुन एकूण ६९५६.०२ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या सुधारित विकास करावयास बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक २३/०२/२०२१ च्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून, तसेच नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे वाडे–भिंतीच्या बांधकामासह, सुधारीत बांधकाम प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| क.ल.न.-५ | |
| दस्त क्र. ९०३३ | २०२३ |
| २८ | ४४ |

बांधकामाचा तपशील :–

इमारत क्र. १ – स्टील्ट (पै.) + पहिला मजला ते पंधरावा मजला ( रहिवास )
इमारत क्र. २ – तळ मजला + पहिला मजला ते सातवा मजला ( रहिवास )
इमारत क्र. ३ – स्टील्ट + पहिला मजला ते दुसरा मजला (डयुपलेक्स, रहिवास)

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR)मधील विनियम क्र. २.८.३ नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करणेपुर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहिल.

२) UDCPR मधील विनियम क्र.1.5 Savings मध्ये नमूद a to h बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांवर बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकारांचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क्र. १२.१ ते १२.३ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी वास्तुशिल्पकार, Structural Engineer व परवानगीधारक यांचेवर राहिल, याची नोंद घ्यावी.

७) भूखंडाकडे जाण्या–येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्यांचा विकास महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे येणा–जाण्याचे मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.

| | |
|---|---|
| टनन-२ | |
| दस्त क्र. ९८८५ | २०२३ |